Golden Research Thoughts
Vol -1 , ISSUE –1, July - 2011
ISSN:- 2231-5063
Available online at www.aygrt.net

ORIGINAL ARTICLE

राष्ट्रीय सभेचा जहाल काळ आणि खानदेश

अनिल माणिकराव बैसाणे

इतिहास विभाग प्रमुख, झेड् बी. पाटील कॉलेज, देवपूर, धुळे .

वृत्तपत्रांचे कार्य

19 व्या शतकात खानदेशात जनजागृतीसाठी काही वृत्तपत्रे निघू लागली. ही वृत्तपत्रे मातृ भाषेतून असल्यामुळे त्यामधून राष्ट्रवादी विचार, भावना व्यक्त होत होते. तथापि स्थानिक वृत्तपत्रांवर इंग्रजांनी कडक निर्बंध लादण्याचा प्रयत्न केला. काही उदारमतवादी गव्हर्नर जनरलांनी वृत्तपत्रांवरील बंधने शिथिल करून त्यांचे विचार प्रकट करण्याचे स्वातंत्र्य दिले. परिणामी वृत्तपत्रातून सरकारवर टिका केली जावू लागली. यामुळे ब्रिटिश सत्तेच्या अन्यायाविरूद्ध संघटीत होण्याचे आवाहन केले जात होते. खानदेशवासियांच्या प्रबोधनात खानदेशातील खानदेश वैभव, खानदेश चित्रगुप्त, आर्यवर्त यासारख्या साप्ताहिकांनी व वृत्तपत्रांनी वैचारिक जागृती निर्माण केली. सामाजिक अन्याय व दुःख यांना वाचा फोडण्याचे कार्य केले. सरकारच्या आर्थिक, राजकिय, सामाजिक धोरणांवर कडक टिका करून घटनात्मक सुधारणांची मागणी वृत्तपत्रातून केली जावू लागली. वृत्तपत्रांमधील प्रभावी लिखाणांमुळे, प्रचारांमुळे नवशिक्षित तरुणवर्ग सरकारविरुद्ध प्रक्षुब्ध झाला आणि स्थानिक पातळीवर लहानमोठ्या संघटना निर्माण होवून मोठ्याप्रमाणात जनजागृती होण्यास मदत झाली. राष्ट्रवादी शक्तीचे संघटन होण्यास मदत झाली. ब्रिटिशांच्या अन्यायाला, शेतकऱ्यांच्या दयनीय अवस्थेला वाचा फोडण्याचं वृत्तपत्रे हे जणू एक प्रभावी हत्यारच मिळाले होते.[1]

राष्ट्रीय सभेची अधिवेशने आणि धुळे जिल्ह्याचे प्रतिनिधित्व व सहभाग

राष्ट्रीय सभेच्या स्थापनेपासून 1904 पर्यंत खानदेशातील राष्ट्रीय चळवळीचे नेतृत्व प्रामुख्याने वकील वर्गाच्या हाती होते. हा वर्ग सुरुवातीपासूनच अग्रेसर होता आणि राजकारणात भाग घेऊ शकत होता. खानदेशातील वकील वर्गाने राष्ट्रीय सभेच्या कार्याचे लोण जनसामान्यांपर्यंत पोहचविण्याचे महत्त्वपूर्ण काम केले. इ.स. 1885 मध्ये मुंबई येथे सर ॲलम ह्यूम या सेवानिवृत्त ब्रिटिश अधिकाऱ्याच्या सहकार्याने राष्ट्रीय सभेची स्थापना होवून पहिल्या अधिवेशनास हिंदुस्थानातून 72 प्रतिनिधी उपस्थित होते. पहिल्या अधिवेशनात पास झालेल्या सर्वच्या सर्व नऊ ठरावांना धुळे येथे झालेल्या सभेत मंजूरी देण्यात आली. प्रथम अधिवेशनात खानदेशवासियांचा प्रत्यक्ष सहभाग नव्हता हे जरी खरे असले तरी ठरावांना मंजूरी देण्याच्या घटनेमुळे खानदेशवासियांचा राष्ट्रीय सभेशी सरळ संबंध जोडला गेला. यापुढे झालेल्या प्रत्येक अधिवेशनांना प्रतिनिधी संख्या वाढतच गेली.

राष्ट्रीय सभेच्या 1888 मध्ये अलाहाबाद येथे झालेल्या 4 थ्या अधिवेशनापासून राष्ट्रीय सभा व ब्रिटिश सरकार यांच्यातील मतभेद वाढायला लागले. पूर्वखानदेशातील जळगाव व भुसावळचे दोन वकील या अधिवेशनाला हजर राहीले होते. इ. स. 1889 मध्ये मुंबई येथे भरणाऱ्या राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनात हजर राहण्यासाठी प्रतिनिधींची निवड करण्याकरिता धुळे येथे सभा घेण्यात आली. धुळ्याचे गोविंद गरुड, सदाशिव सोमण वकील, मावनराव रानडे वकील, दामोदर देशपांडे वकील इ. ची प्रतिनिधी म्हणून निवड करण्यात आली. शिवाय पूर्वखानदेशातूनही काही प्रतिनिधी हजर राहीले होते.

राष्ट्रीय सभेच्या संघटनात्मक कार्याने प्रभावित होऊन शंकर श्रीकृष्ण देव यांनी खानदेशातील तरुणांना वाट दाखविण्यासाठी आणि त्यांचे ध्येय जागृत ठेवण्यासाठी 1893 मध्ये सत्कार्यात्तेजक सभा नावाच्या संस्थेची स्थापना केली आणि आपल्या बुद्धीकौशल्याच्या जोरावर व वक्तृत्वाच्या जोरावर देवांनी तरुणांवर छाप पाडली. खानदेशी जनतेत देशभक्तीची सुप्त भावना जागविण्यासाठी अनेक उपक्रम सुरू केले आणि राष्ट्रीय सभेच्या चळवळीचे लोण खनदेशात पसरविले. 1894 साली मद्रास येथे राष्ट्रीय सभेचे अधिवेशन भरले. राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनाबरोबरच सामाजिक परिषदही भरत असे. सामाजिक सुधारणेची तळमळ असणारे धुळ्याचे बाळकृष्ण कोतवाल हे या अधिवेशनासाठी आणि सामाजिक परिषदेसाठी खानदेशचे प्रतिनिधी म्हणून हजर होते. तसेच नंदुरबारचे यादव पारखे वकील सभेच्या अधिवेशनाला हजर होते. 1895 साली पुणे येथे राष्ट्रीय सभेचे अधिवेशन भरले असता यावेळी सामाजिक परिषदेला राष्ट्रीय सभेचा मंडप वापरू द्यावा किंवा नाही याबाबत मतभेद उफाळून आले. त्यावेळी सामाजिक परिषदेचे अधिवेशन राष्ट्रीय सभेच्या मंडपात भरवू नये असा आग्रह लो. टिळकांच्या

अनुयायांनी धरला. तेव्हा या घटनेचे पडसाद खानदेशातही उमटले. खानदेशात दोन्ही विचारांचे लोक होते. या विषयावर चर्चा करण्यासाठी धुळ्याला सभा भरविण्यात आली. दामोदर देशपांडे वकील अध्यक्ष होते, तेव्हां सामाजिक परिषद, राष्ट्रीय सभेच्या मंडपात भरवू नये असा ठराव मंजूर करण्यात आला होता. असाच ठराव जळगावच्या सभेत करण्यात आला होता. थोडक्यात टिळकांच्या विचारांचा प्रभाव खानदेशवासियांवर पडलेला होता असंच दिसून येते.[2]

लोकमान्य टिळक आणि खानदेश

1905 मध्ये लॉर्ड कर्झनने राज्यकारभाराच्या सोयीचे कारण दाखवून बंगाल प्रांताची फाळणी केली आणि पूर्व बंगाल हा मुस्लीम बहुसंख्यांक असा वेगळा प्रांत केला. या फाळणीमुळे बंगालसह सर्व भारतातील जनमत प्रक्षुब्ध बनले. याचे पडसाद खानदेशातही उमटले. अशा परिस्थितीत राष्ट्रीय सभेच्या सनदशीर राजकारणाला क्रांतीकारक वळण देण्याचा लोकमान्य टिळकांनी प्रयत्न सुरू केला. स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण, स्वराज्य या सूत्रांच्या आधारे प्रबळ लोकशक्ती संघटित करणे आणि त्याद्वारे राष्ट्रीय सभेच्या मागण्या मान्य करण्यास ब्रिटिश सत्तेस भाग पाडणे, हा मार्ग टिळकांनी स्वीकारला होता. त्यामुळे टिळकांच्या ह्या चळवळीच्या निमित्ताने भारतीय राजकारणाला व्यावहारिक स्वरुप प्राप्त झाले होते. टिळकांच्या स्वदेशी चळवळीचे पडसाद संपूर्ण खानदेशात उमटू लागले. स्वदेशी मालाचा पुरस्कार व परदेशी मालावरील बहिष्काराच्या संदर्भात खानदेशात धुळे येथे नारायण बर्वे, गोविंद चांदोरकर आदि नेत्यांची व्याख्याने झाल्याच्या नोंदी तसंच ब्रिटिश मालावर बहिष्कार टाकावा अशा प्रकारची पत्रके धुळे शहरात ठिकठिकाणी चिटकविण्याच्या नोंदी सरकारी अहवालात आढळतात. स्वदेशी चळवळीला चालना देण्यासाठी धुळे येथे खानदेश जिल्हा स्वदेशी संस्था स्थापन करण्यात आली. महिलांच्या सभा होऊ लागल्या होत्या. ठिकठिकाणी स्वदेशी वस्तूंची प्रदर्शने भरविण्यात येत होती. विदेशी टोप्यांच्या व कापडांच्या होळ्या केल्या जात होत्या. सर्वत्र स्वदेशीचा प्रचार जोमाने सुरु होता. खानदेशात अमळनेरला सूत काढण्याचा व कापड विणण्याचा उपक्रम सुरू झाला. स्वदेशी चळवळीचा खानदेशात चांगला परिणम घडून आला. स्वदेशी कापडाची दुकाने निघू लागली. हातमागाचे कारखाने सुरू झाले. मद्यपान बंदीची चळवळ सुरू झाली. या राजकीय चळवळीत सामान्य जनता सहभागी झाली होती. स्वदेशी, बहिष्कार, स्वराज्य, राष्ट्रीय चळवळीत सामान्य जनता सहभागी झाली होती. स्वदेशी, बहिष्कार, स्वराज्य, राष्ट्रीय शिक्षण या टिळकांच्या चतुःश्रुती विषयांवर खानदेशातील नेत्यांची भाषणे होऊन जनतेला चळवळीची प्रेरणा दिली जात होती. मात्र सुरतेच्या राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनात नेत्यांमध्ये दुफळी पडली. त्यातच 1908 मध्ये मुझफ्फर येथे बॉम्ब स्फोटाचा पहिला प्रयोग झाला. अन् त्याचे पडसाद सर्व भारतभर उमटले. टिळकांनी आपल्या केसरी या वृत्तपत्रातून स्फोटाच्या घटनेबाबत विचार मांडले. तेव्हा सरकारने दडपशाहीचे धोरण स्वीकारले आणि राजद्रोहाच्या आरोपाखाली टिळकांना 6 वर्षाची सक्तमजुरीची हद्दपारीची व एक हजार रुपये दंडाची शिक्षा ठोठावण्यात आली. या घटनेचे पडसाद सर्व खानदेशात उमटले.

धुळ्यातील विद्यार्थ्यांनी शाळेत जाणे बंद केले. हिंदू–मुसलमान व्यापाऱ्यांनी दुकाने बंद ठेवली. खानदेशातील शेतकऱ्यांनी पोळ्यासारखा सणही साजरा केला नाही. साक्री तालुक्यातील काही शिक्षकांनी शाळेत जाणं बंद केले. यावेळी खानदेशतील क्रांतीकारमांमध्ये सशस्त्र उठावाचं स्वरुप निर्माण होऊ लागलं. धुळ्याच्या शंकरराव देवांच्या प्रयत्नांमुळे शस्त्रास्त्रे मिळवली. तथापि पूर्व खानदेशातील ब्रिटिश पोलीस अधिकारी वेळीच सावध झाले होते. अशाप्रकारे खानदेशातील क्रांतीकारकांच योगदान या उठावात होतं.[3]

1892 च्या कायदे मंडळाच्या निवडणुका आणि खानदेश

1892 च्या कायद्याने लोकनियुक्त सभासद नेमण्याचं तत्त्व मान्य करण्यात आले होते. सोलापूर, सातारा, नासिक, खानदेश, पुणे व नगर या विभागवार मिळून बनलेल्या भागाला हे तत्त्व लागू केलंलं नव्हतं. त्यामुळे या तत्त्वाविरुद्ध राष्ट्रीय सभेची चळवळ तीव्र झाली होती. 1895 मध्ये या भागातील लोकल बोर्डाचा लोकप्रतिनिधी निवडला जाण्याचं जाहीर करण्यात आलं होतं. तेव्हा 1895 मध्ये निवडणुकीसाठी खानदेशचे धोंडो शामराव गरुड उमेदवार होते. तर श्रीराम ठकार मवाळ गटातर्फे उभे होते आणि टिळक जहाल गटातर्फे उमेदवार होते. टिळकांना 65 पैकी 35 मते मिळून ते विजयी झाले. पुढे 1897 मध्ये कायदेमंडळाची मुदत संपून लोकल बोर्डातर्फे धुळ्याचे धोंडो गरुड पुन्हा उभे राहिले तर विरोधात टिळक, निवडणुकीत टिळक विजयी झाले. याच काळात रॅण्डचा खूनाचे प्रकरण खूपच गाजले. अन् टिळकांना प्रतिकूल परिस्थितीमुळे कायदेमंडळाचा राजीनामा द्यावा लागला. रिक्त झालेल्या जागी सरकारने धोंडो गरुडांची नेमणूक केली. 1899 मध्ये पुन्हा निवडणुक झाली. खानदेशचे धोंडो गरुड पुन्हा निवडणुकीस उभे राहीले. त्यांच्या विरोधत मवाळ गटाचे ख्यातनाम नेते गोपाळ कृष्ण गोखले उभे होते. या निवडणुकीत गोखले विजयी झाले.

या काळात टिळकांच्या चळवळी जनसामान्यांवर प्रभावी ठरत होत्या. त्यातच त्यांनी सामान्य जनतेत राष्ट्रीय व राजकीय जागृती निर्माण करण्याची तसेच गणेशोत्सव व शिवाजी उत्सव राजरा करण्याची कल्पना शंकर देवांच्या प्रभावी वकृत्वामुळे खानदेशवासीयांनी उचलून धरली. या उत्सवांना खानदेशातून चांगला प्रतिसाद मिळाला. अन् राष्ट्रीय सभेची चळवळ खानदेशात मजबूत बनू लागली. सशस्त्र क्रांतीच्या मार्गानेच देशाला परकीयांच्या तावडीतून मुक्त केल्याशिवाय पर्याय नाही असे मानणाऱ्यांचा एक वर्ग खानदेशात होता. धुळ्यासह सर्व खानदेशातील तरुणांवर देशभक्तीचे संस्कार करण्याचे व त्यातील

निवडक तरुणांना क्रांती कार्यात ओढण्याचे कार्य धुळ्याच्या आप्पासाहेब व भाऊसाहेब रणदिवे या बंधूंनी सुरू केले. खानदेशासारख्या मागासलेल्या जिल्ह्यात जनजागृतीचे कार्य प्रारंभी या बंधूनी सुरू केले. खानदेशासारख्या मागासलेल्या जिल्ह्यात जनजागृतीचे कार्य प्रारंभी या बंधूंनी सुरू केले. खानदेशसारख्या मागासलेल्या जिल्ह्यात जनजागृतीचे कार्य प्रारंभी वकील वर्गाने केले आणि चळवळीचे लोण जनसामान्यांपर्यंत पोहचविण्याचे महत्त्वाचे कार्यही वकील वर्गाने केले.[4]

मॉटेग्यू घोषण आणि खानदेश

1914 मध्ये पहिले महायुद्ध सुरू झाले. 1914 मध्ये टिळकांची तुरुगातून सुटका झाली. होमरुल लीगला टिळकाचे नेतृत्व मिळाले. पश्चिम खानदेशात जी. के. भिडे यांच्याकडे लीगचे कार्य सोपविण्यात आले. 1916 मध्ये लखनौला एकाचवेळी राष्ट्रीय सभा व मुस्लिम लीग यांची अधिवेशने भ्रली. त्यांच्यात तेथे करार होऊन दोन्ही पक्षांनी स्वराज्याची मागणी केली. तेव्हा ॲनी बेझंट व टिळकांच्या होमरूल चळवळीचा जोर व लोकप्रियता पाहून ब्रिटिश सरकारने दडपशाहीचा मार्ग स्वीकारला. पश्चिम खानदेशातील ग्रामीण भागातही लीगची चळवळ पसरली आणि स्वराज्याची मागणी करण्यात येऊ लागली. अशा काळात ऑगस्ट 1917 मध्ये भारतमंत्री मॉटेग्यू यांनी हिंदूस्थानाला जबाबदार राज्यपद्धती देण्याचे धेरण जाहीर केले. तेव्हा याचे पडसाद पश्चिम खनदेशात उमटले आणि ब्रिटिश साम्राज्यांतर्गत स्वराज्याची मागणी होऊ लागली. त्यातच 1918 मध्ये महायुद्धाचा शेवट झाला. सरकारने जाहीर केल्याप्रमाणे मॉड–फर्ड कायदा प्रसिद्ध झाला. हा सुधारणा कायदा अपूर्ण व असमाधानकारक असल्यामुळे धुळ्याला सिद्धनाथ गरुडांच्या अध्यक्षतेखाली जावडेकर, चांदोरकर, कुंटे, शंकरराव देव आदी नेत्यांची सभा होऊन या कायद्याला विरोध करणारा ठराव संमत करण्यात आला.[5]

संदर्भ :

1.पांडे डॉ. मधुकर, ***खानदेशातील स्वातंत्र्य चळवळ, समाविष्ट – खानदेशच्या सांस्कृतीक इतिहास*** (संपा.), शहा मु. ब., का.स. वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्था, धुळे, खंड – 3 व 4, जानेवारी 2004, पृ. 56, 57.
2.***तत्रैव***, पृ. 57, 58
3.नाशिककर का. वि. (प्रका.), ***धुळे नगरपालिका शतसांवत्सरी महोत्सव*** – ग्रंथ, 1962, पृ. 5.
4.बापट गो. म. (संपा.), ***धुळे जिल्हा स्वातंत्र्य सैनिक गौरव ग्रंथ,*** धुळे, 1988, पृ. 2
5.शहा मु. ब. (संपा.), ***सत्वगुणी (श्री. कांतीताल गुजराती गौरव ग्रंथ),*** श्री. कांतीलाल गुजराती सत्कार समिती, धुळे, 1994, पृ.

अनिल माणिकराव बैसाणे
इतिहास विभाग प्रमुख, झेड् बी. पाटील कॉलेज, देवपूर, धुळे .